# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


कार्यालयीन आदेश.

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1877

दिनांक :- 26 JUL 2023

प्रति,

प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी रिक्त जागांची नोंदणी करण्याबाबत..**

**संदर्भ :-** १. मा.आयुक्त, सीईटी सेल, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- TED 1223/C.R./07/Cap/DSP Extebsion Notice/2923/1575 Date :- 21/07/2023.
2. TED 1223/C.R./07/Cap/DSP Extebsion Notice/2923/1576 Date :- 21/07/2023.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भिय १ चे अधिसूचनेव्दारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची Seat Matrix दिनांक ३/८/२०२३ रोजी तसेच थेट व्दितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची Seat Matrix दिनांक २/८/२०२३ रोजी प्रसिध्द होणार आहे त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील थेट व्दितीय वर्षासाठी प्रवेशासाठी रिक्त जागांची नोंदणी करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, थेट व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची परिगणना करुन ती माहीती दिनांक **२६/०७/२०२३** रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आपल्या पोर्टलवर भरुन कन्फर्म करावी. व **अभियांत्रिकी पदवी संस्थांनी दिनांक २७/०७/२०२३ रोजी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्थांनी दिनांक २८/०७/२०२३ रोजी** सदर प्रवेशाबाबत जाणकार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयास खालील कागदपत्रासह हजर राहावे.

**१.संस्थेच्या लॉगिनमधुन काढलेली प्रत प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह. २.प्रथम व व्दितीय सत्राच्या निकालाची प्रत. ३.संस्था बदल असल्यास संस्थाबदल केल्याबाबतची या कार्यालयाची किंवा संचालनालयाची प्रत ४.संस्था अंतर्गत शाखाबदल केलेली असल्यास विद्यार्थ्याचे अर्ज, त्यांची गुणवत्ता यादी व शाखाबदल केलेल्या विद्यार्थ्यांची यादी. ५.विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केलेला असल्यास प्रवेश रद्द केल्याबाबतचा विद्यार्थ्याचा अर्ज. ६. प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय सोडल्याचा दाखल्याची छायांकीत प्रत. ६. या कार्यालयाव्दारे कन्फर्म केल्यानंतर काढण्यात आलेल्या प्रतिवर प्राचार्यांच्या वतीने स्वाक्षरी करण्याकरीता सबंधिताचे नावाचे अधिकारपत्र.**

थेट व्दितीय वर्षाच्या रिक्त जागांची माहीती कन्फर्म करतांना ती अचुक असेल याची दक्षता घेण्यात यावी. सदर रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहीतीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास होणा-या परिणामास सबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक हे सर्वस्वी जबाबदार राहील, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**( म.म. अंधारे)**
सहा.संचालक(तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.